साप्ताहिक

न्यायस्वातंत्र्य समता

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

संपादक : रमेश अ. शेळके कार्यकारी संपादक : ॲड. चंद्रकांत गायकवाड

RNI NO.: MAHARAR/2010/36016
Website : nyayswatantryasamata.weebly.com

● वर्ष : ७ वे ● अंक : ५ वा ● सोमवार दि. १३ ते १९ मार्च २०१७ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत २ रुपये

NEWS वाचकांसाठी

अप्रकाशित साहित्य प्रकाशित केले जाईल. व आपले लेख / बातम्या जाहिरातीसाठी संपर्क साधा.
पत्ता : सिद्धीविनायक केशर बिल्डिंग, ३०५, तीसरा मजला,४३३/अ, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११
Mob.: 9561924323/8554891279
Email : remesh.shelke24@yahoo.com
Web : nyayswatantryasamta.weebly.com

संक्षिप्त बातम्या



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

पुणे : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघातांची मालिका आता प्राण्यांच्या जीवावर बेतत असल्याचे दिसत आहे. द्रुतगती मार्गावर शनिवारी सकाळी वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला आहे. अपघातात मृत्यू झालेल्या बिबट्या नर जातीचा असून त्याचे वय अंदाजे २ वर्षे इतके आहे. शनिवारी सकाळी सहा ते सातच्या दरम्यान ओझर्देगाव हद्दीतील उर्से टोल नाक्याजवळ ही घटना घडली. पाण्याच्या शोधात बिबट्या या ठिकणी आला असावा, असा अंदाज वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. बिबट्याला धडक दिलेल्या वाहनाबद्दल कोणतीही माहिती मिळालेली नाही. वन विभागाने भारतीय वन्यजीव कायद्यातील कलमानुसार अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. परिसरामध्ये असणाऱ्या घनदाट झाडीमुळे या ठिकाणी बिबट्यांचा वावर असल्याचे दिसते. बिबट्याच्या वृत्तामुळे परिसरात भीतीचे वातावरण असताना या अपघातामुळे द्रुतगती मार्ग आता प्राण्यांसाठी घातक ठरत असल्याचे दिसते आहे.

क्रेन च्या अपघातात कर्मचार्याचा मृत्यू

पुणे : पिंपरी चिंचवड ही औद्योगिक नगरी मानली जाते.मात्र याच नगरीत कर्मचारी सुरक्षित राहिला नाही.मोशी येथील ओंकार डाईस प्रा.ली या कंपनीत कर्मचार्याचा मृत्यू झाला आहे. किसून रघुनाथ राम अस क्रेन च्या अपघातात मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. क्रेनला लोखंडी प्लेटा आणि मोठे लोखंड लावले होते. ते क्रेनच्या साह्याने वर उचलले तेवढ्यात क्रेनची चैन तुटली आली खाली असलेल्या किसून रघुनाथ राम वय वर्ष ३७ यांच्या अंगावर पडले.यात ते गंभीर जखमी झाले होते त्यांना जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारादरम्यान त्यांचा दुदैवी मृत्यू झाला.क्रेनचालक कांबळे आणि ओंकार डाईस प्रा.लि चे मालक भालचंद्र कोलते यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. अद्याप कोणालाही अटक नाही. अशी माहिती भोसरी एम आय डी सी पोलिसांनी दिली. अधिक तपास पी यस आय जगदाळे हे करत आहेत. किसून रघुनाथ राम अस क्रेन च्या अपघातात मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

कार रिव्हर्स घेताना चिमुकलीचा दुर्दैवी अंत

पुणे : कार रिव्हर्स घेताना मागील चाकाखाली दीड वर्षाची चिमुकली आल्याने, तिचा अंत झाल्याची दुर्दैवी घटना पुण्यातील नारायण पेठेत घडली आहे. सुप्रिया वेंकट वालिका असे या चिमुरडीचे नाव आहे. सुप्रिया ही सीताराम अपार्टमेंट या इमारतीच्या पार्किंगमध्ये खेळत होती. त्यावेळी त्याच इमारतीत राहणारा एक व्यक्ती आपली कार पार्किंगमधून काढत होता. त्यावेळी चिमुकली सुप्रिया कारच्या मागील चाकाखाली आली आणि तिचा दुर्दैवी अंत झाला. दरम्यान, तिच्या या मृत्युमुळे अपार्टमेंटमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी नारायण पेठ पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. मात्र अद्याप कोणालाही अटक झालेली नाही.

भाविकांवर काळाची उरळीकांचन जवळ झडप; ११ ठार

पुणे - सोलापूर महामार्गावर अपघात

अपघातात चक्काचूर झालेली प्रवासी मिनी बस आणि ट्रक.

पुणे (प्रतिनिधी) : देवदर्शनासाठी मुंबईच्या मुलुंड येथून अक्कलकोटला जाणाऱ्या १७ आसनी मिनी प्रवासी बसला उरुळी कांचन येथे भारदस्त रानडुक्कर आडवे आले. यावेळी मिनी बसने डुकराला चिरडून उसळी खाऊन रस्ता दुभाजक तोडून विरोधी मार्गाने येणाऱ्या सिमेंट वाहतूक करणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिली. यामुळे झालेल्या भीषण अपघातात मिनी प्रवासी बसमधील सर्व ११ प्रवासी जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि. ११) पहाटे तीनच्या सुमारास पुणे -सोलापूर महामार्गावर उरुळी कांचनजवळ कोरेगावमूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनामदारवस्तीजवळ घडली आहे. या भीषण अपघातात भरधाव ट्रकने मिनीबसला ५० फूट अंतरापर्यंत पुढे रेटून नेले असून, या अपघातात चार कुटुंबांतील पती-पत्नी या दाम्पत्यांचा जागीच मृत्यू झाला असून, त्यात एका मुलीचा समावेश आहे. अपघातात मृत पावलेले आठजण हे मुलुंड पूर्वचे रहिवासी आहेत.

याबाबत घटनास्थळावरून तसेच पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलुंड पूर्वहून अक्कलकोटला देवदर्शनासाठी ज्योती ट्रॅव्हल्स कंपनीच्या खासगी प्रवासी बसने (एमएच ४३ एच ७५७१) ११ प्रवासी पुणे-सोलापूर महामार्गावरून सोलापूर दिशेने निघाले होते. मिनी प्रवासी बस कोरेगावमूळ हद्दीतील इनामदारवस्तीवरून जात असताना मिनी बसला अचानक भारदस्त रानडुक्कर रस्त्यावर आडवे आले. यावेळी मिनी बस चालकाने क्षणाचा विलंब न होता हे रानडुक्कर चिरडले. यावेळी या जनावराच्या वजनाने बसने महामार्गावरून उसळी खाल्ली व ही बस महामार्गावरून दुभाजक ओलांडून विरोधी मार्गावर जाऊन पुण्याकडे सिमेंट वाहतूक करणाऱ्या ट्रकवर (एमएच १३ एक्स ३५०३) जोरदार आदळली गेली. या धडकेत ट्रकने मिनीबसला साधारण ५० फूट पुढे फरफटत नेले. यावेळी ही मिनी बस ट्रकच्या दर्शनी भागात अडकून बसचा चक्काचूर झाला. प्रवाशांच्या शरीर, डोके व इतर अवयवांना गंभीररीत्या मार बसून, हे प्रवासी अपघातात जागीच ठार झाले.

या अपघाताचा आवाज ऐकताच इनामदारवस्तीवरील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास लोणी-काळभोर पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी मदतकार्यास मदत केली. उरुळी कांचन पोलिस दूरक्षेत्राचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक रणजितसिंह परदेशी यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्तांची पाहणी केली. या घटनेत ट्रक व मिनी बस परस्परांत अडकल्याने या अपघातग्रस्तांना क्रेनच्या साह्याने बाहेर काढण्यात आले. परंतु या भीषण अपघातात बसमधील एकही या मृत्यूचा दाढेतून सुखरूप सुटू शकला नाही. तब्बल दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर पोलिस व कस्तुरी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना पहाटे साडेपाचच्या दरम्यान अपघातग्रस्तांना बाहेर काढण्यात यश आले.

या अपघातात मिनी बस चालक केतन सुरेश पवार (वय २९), विजय बाळकृष्ण काळे, ज्योती विजय काळे, योगेश रामचंद्र लोखंडे, जयवंत नामदेव चव्हाण (वय ४८), योगिता जयवंत चव्हाण (वय ४४), रेवती जयवंत चव्हाण (वय १३), कविता जयगिते (वय २८, रा.ठाणे), शैलजा पंडित (रा. निता आपर्टमेंट, मुलूंड पूर्व, मुंबई), प्रदीप रामचंद्र अवचट, सुलभा प्रदीप अवचट (दोघेही रा. आणे, ता. जुन्नर) हे मृत्युमुखी पडले आहेत.

या अपघाताची तीव्रता लक्षात घेता पुणे ग्रामीण पोलिस अधिक्षक सुवेझ हक, अतिरिक्त पोलिस अधिक्षक तानाजी चिखले, महामार्ग पोलिस अधिक्षक अमोल तांबे, हवेली उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. वैशाली कडूकर, भोर उपविभागीय अधिकारी अशोक बराते, लोणी काळभोर पोलिस निरीक्षक बाळासाहेब कोंडूभैरी यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

अपघाताची दाहकता पाहून बचावकर्ते स्तब्ध

पहाटे ३.२५ वाजण्याच्या सुमारास अपघात घडल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस पथक व त्यानंतर कस्तुरी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते रुग्णवाहिका घेऊन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी मिनी बसची झालेली अवस्था व बसमध्ये छिन्नविच्छिन्न अवस्थेत पडलेले मृतदेह पाहून घटनास्थळी मदत कार्यास पोहोचलेल्या बचावकर्त्यांच्या पायाखालील जमीनच सरकली. अपघाताची परिस्थिती पाहून कस्तुरी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते या संपूर्ण घटनेने स्तब्ध झाले होते. या घटनेत काळीज मोठे करीत त्यांनी प्रथम सर्व अपघातग्रस्तांची पाहणी केली. बचावकर्त्यांची मिनी बसमधील एखादी व्यक्ती मरणाचा दारातून सुटेल का अशी अपेक्षा फोल ठरली. पहाटे चार वाजता बचावकर्त्यांनी मदत कार्य सुरू केले. यावेळी त्यांनी ट्रकमध्ये अडकलेल्या मिनी बसमधील खुर्च्या व दरवाजे तोडून क्रेन, बेल्ट आदींच्या साह्याने तोडले आणि बसमधील मृतदेहांना साधारण दीड तासांच्या अथक प्रयत्नांतून बाहेर काढण्यात यश मिळविले.

कस्तुरी प्रतिष्ठानचे कौस्तुभ मेमाणे, महादेव रेवडकर, संतोष खंडाळे, वैजनाथ कदम, लक्ष्मण जाधव, संतोष झोंबाडे, किशोर मेमाणे, नाना मेमाणे, मिलिंद मेमाणे आदी कार्यकर्त्यांनी मदत कार्यात तत्परता दाखवून मृतदेहांना हलविण्यात परिश्रम घेतले.

रमेश कदम यांची १३५ कोटींची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश

मुंबई : अण्णाभाऊ साठे महामंडळातील घोटाळ्याप्रकरणी अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे निलंबित आमदार रमेश कदम यांच्या जंगम आणि स्थावर अशा एकूण १३५ कोटी रूपयांच्या मालमत्ता जप्तीचे आदेश मुंबईच्या विशेष सत्र न्यायालयाने शुक्रवारी देत कदम यांना तडाखा दिला आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. डी. टंखीवाले यांनी हे आदेश दिले. न्यायालयाच्या आदेशानुसार कदम यांची एकूण १३५ कोटी १६ लाख ८२ हजार ६०८ रूपयांची मालमत्ता जप्त करण्यात येणार आहे. त्यात शेती, भूखंड, पेडर रोड येथील भूखंड, औरंगाबाद येथील मालमत्ता अशा एकूण ५४ मालमत्तांचा समावेश आहे. शिवाय वेतनाचे खाते वगळता सगळी बँक खाती गोठवण्याचेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

अण्णाभाऊ साठे महामंडळ घोटाळ्याप्रकरणी कदम हे सध्या अटकेत असून त्यांच्यावर ४०० कोटी रूपयांहून अधिकचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. अण्णाभाऊ साठे महामंडाळात २५० कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असून त्याचे ३७०० पानी पुरावे लाचलुचपत प्रतिबंधक विभागासह अन्य विभागांना दिल्याचा दावा माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी केला होता. तसेच महामंडळाचे माजी अध्यक्ष असलेले कदम हे या सगळ्या घोटाळ्याचे सूत्रधार असल्याचा आरोप त्यांनी केला होता. कोणतीही प्रक्रिया न राबवता ७३ जणांची भरती केल्याचा, नियुक्त झालेल्यांना २० लाख रूपयांचे गृहकर्ज उपलब्ध करून देत त्यातील १५ लाख रूपये लाच म्हणून घेतल्याचाही आरोप कदम यांच्यावर आहे.

शिवाय अनेक कर्ज प्रकरणांवर खोटय़ा सह्या घेण्यात आल्या, लाभार्थीना परस्पर धनादेश देण्यात आल्याचा, महालक्ष्मी दूध संस्था, खंडाळी, बारामतीत दूध संघाला पाच कोटी रूपये कागदोपत्री वाटप केल्याचा व विधानसभा निवडणुकीत कदम यांनी सहा कोटी रूपये खर्च केल्याच्या आरोपांचाही समावेश आहे.

▶ कोणतीही प्रक्रिया न राबवता ७३ जणांची भरती

♦ उस्मानाबादच्या नेटकेंनी मुलाला, बावणेंनी मुलीला सेवेत घेतलं. ♦ नियुक्त झालेल्यांना २० लाखांचे गृहकर्ज उपलब्ध करुन दिले. त्यातले १५ लाख रुपये लाच म्हणून घेण्यात आले. ♦ अनेक कर्ज प्रकरणावर खोट्या सह्या घेतल्या. ♦ लाभार्थींचे चेक परस्पर वाटण्यात आले. ♦ महालक्ष्मी दूध संस्था, खंडाळी, बारामीत दूध संघाला ५ कोटी कागदोपत्र वाटण्यात आले. ♦ विधानसभा निवडणुकीत रमेश कदमांनी ६ कोटी ५६ लाख रुपये वाटल्याचा आरोप.

'मतदानयंत्रात घोटाळा करून भाजपने केली लोकशाहीची हत्या'

लखनौ : केंद्रात सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाने मतदानयंत्रात घोटाळा करून उत्तरप्रदेश विधानसभा निवडणूक जिंकल्याचा आरोप बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी केला आहे. मुस्लीम समाजाचे प्राबल्य असलेल्या भागात भाजपला इतरांपेक्षा अधिक मते मिळालीच कशी; असा सवालही त्यांनी केला आहे. भाजपच्या या कृत्याने लोकशाहीची हत्या केल्याचा आरोपही त्यांनी केला.

उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानात मतदारांनी समाजवादी पक्ष किंवा बसपला मत देण्यासाठी त्यांच्या चिन्हावर बटन दाबले; तरी ती मते देखील भाजपच्या पारड्यात पडल्याचे दाखले आपल्याकडे असल्याचा दावाही मायावती यांनी केला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहून पुन्हा जुन्या मतपत्रिका-मतपेटीच्या माध्यमातून निवडणुका घेण्यात याव्या; अशी मागणीही त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे पक्षाध्यक्ष अमित शहा यांच्याकडे केली आहे.

भाजपने लोकशाहीची हत्या केली असून हेचसुरु राहिले तर सन २०१९ मध्ये पुन्हा भाजप सत्तेवर येईल. मतदारांचा 'इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन'वरचा विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे या प्रकाराला वेळीच आळा घालणे आवश्यक आहे.

त्यासाठी बसप पुढाकार घेणार असून इतर पक्षांनीही त्याला साथ द्यावी; असे आवाहनही त्यांनी केले. उत्तरप्रदेशप्रमाणेच उत्तराखंड निवडणुकांचे निकाल संशयास्पद आहेत. मात्र छोट्या राज्यांमध्ये निष्पक्ष निवडणूक झाल्या असून त्या ठिकाणी भाजपाचीअवस्था बिकट असल्याचा आरोप मावती यांनी केला.

योगिता मोरेचा विज्ञान प्रदर्शनात प्रथम

पुणे : कॉग्निझंट कंपनी हिंजवडी पुणे येथे दिनांक ५ मार्च २०१७ रोजी विज्ञान प्रदर्शन आणि स्पर्धा भरविण्यात आल्या. पुणे पिंपरी चिंचवड भागातील सरकारी तसेच खासगी शाळांनी या मध्ये सहभाग घेतला.

स्पर्धेचे नाव आईन्स्टाईन हंट सायंन्स मॉडेल या स्पर्धेत पिचिमनपा वाकड शाळा मुली क्रमांक ५७/२ या प्राथमिक शाळेतील योगिता मोरे इयत्ता ७ वी, मुस्कान शेख इयत्ता ७वी या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रश्न मंजुषा स्पर्धेत भारती अडागळे इ. ७वी, आरती अडागळे इयत्ता ६ वी यांनी पारितोषिक जिंकले. बक्षीस वितरण सभारंभ हिंजवडी पुणे येथे पार पडला. प्राथमिक पि. चि. मनपा वाकड कन्या ५७/२ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा गायकवाड, सदैव प्रयत्नशील असलेले शाळेचे सर्व शिक्षक तसेच कॉग्निझंट कंपनीचे मधुर सर आणि सहकारी यांचे मार्गदर्शन विद्यार्थिनीना लाभले.

नयना पुजारी खटला: सरकारी पक्षाकडे पुरेसा पुरावा नाही

पुणे (प्रतिनिधी) : नयना पुजारी अपहरण, सामुहिक बलात्कार आणि खुन प्रकरणात बचाव पक्षाचा अंतिम युक्तीवाद सुरू झाला आहे. आरोपींविरोधात सरकारी पक्षाकडे पुरेसा पुरावा नसल्याचा युक्तीवाद बचाव पक्षातर्फे ॲड. बी. ए. आलुर यांनी केला आहे. दरम्यान या खटल्याची पुढील सुनावणी १७ मार्च रोजी होणार आहे.

नयना पुजारी खटल्याची सुनावणी येथील विशेष न्यायाधीश एल. एल. येनकर यांच्या न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे विशेष सरकारी वकील हर्षद निंबाळकर, बचाव पक्षातर्फे ॲड. बी. ए. आलुर, ॲड. रणजित ढोमसे-पाटील आणि ॲड. अंकुश जाधव काम पाहत आहेत. नुकताच सरकारी पक्षाचा अंतिम युक्तीवाद संपला आहे. त्यानंतर आज बचाव पक्षाच्या अंतिम युक्तीवादास सुरूवात झाली आहे.

युक्तीवाद करताना ॲड. आलुर म्हणाले, आरोपीविरूध्द केलेले जप्ती, निवेदन, घटनास्थळ आणि अटक पंचानामा सिध्द होत नाहीत. सीडीआर रिपोर्टही सिध्द होत नाही. सोन्याची बांगडी ही आरोपीच्या ताब्यातून नाही, तर ठाकुर याच्या घरातून जप्त करण्यात आलेली आहे. त्यामुळे बांगडी पंचनामाही सिध्द होत नाही. साक्षीदारांनी सांगितलेले आरोपींच्या कपड्याचे वर्णनही मिळते जुळते नाही. राजेश चौधरी हा या खटल्यातील माफीचा साक्षीदार आहे. तो पश्चातापापोटी माफीचा साक्षीदार झाल्याचे सरकारी पक्षांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, वास्तविक न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आपल्या विरोधात काय पुरावा आहे, याचा अभ्यास करून चौधरी माफीचा साक्षीदार आहे. त्यामुळे त्याने दिलेला कबुली जबाब ग्राह्य धरू नये. वकिलांच्या सांगण्यावरून मी या प्रकरणात माफीचा साक्षीदार झालो असल्याचे चौधरी याने न्यायालयात सांगितले होते. याचा न्यायालयाने गांभीर्याने विचार करावा. तसेच चौधरी याच्या सांगण्यावरून आरोपींना नयना पुजारी यांचा खुन केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे आणि त्यांच्या वस्तु लुटल्याचे सिध्द होत नाही, असेही ते म्हणाले.

स्वाइन फ्लूने तरुणाचा मृत्यू; आतापर्यंत ९ दगावले

पुणे : कर्वेनगर येथील एका ४० वर्षीय तरुण व्यक्तीचा गुरुवारी रात्री एका खासगी रुग्णालयात स्वाइन फ्लूने मृत्यू झाला. यावर्षी शहरातील हा नववा मृत्यू असल्याचे पालिकेच्या आरोग्य विभगाच्या आकडेवारीवरुन स्पष्ट झाले आहे.

या तरुणाला १७ फेब्रुवारीला शहरातील एका खासगी रुग्णालयात उच्च रक्तदाबाचा त्रास होत असल्याने दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर त्याला स्वाइन फ्लू झाल्याचे निदान झाले. तेव्हाच त्याला टॅमीफ्लू देण्यात आले होते. २१ तारखेला त्याला स्वाइन फ्लू झाल्याचे निदान करण्यात आले होते. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. मात्र, गुरुवारी रात्री साडे अकरा वाजता विविध अवयव निकामी झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

१४ एप्रिलपर्यंत सुरू होणार बाबासाहेबांच्या स्मारकाचे काम : आठवले

मुंबई (प्रतिनिधी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या प्रत्यक्ष कामास जयंतीदिनी १४ एप्रिलपर्यंत सुरुवात होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हे आश्वासने दिल्याची माहिती आठवले यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी झालेल्या चर्चेत इंदूमिल स्थळी तोडकाम सुरू असून कोणत्याही प्राधिकरणाने तेथे काम करण्यास मनाई केलेली नाही.

स्मारकाचे प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी आवश्यक त्या सर्व विभागाची परवानगी घेतली असून महापालिकेचेही आवश्यक पत्र लवकरच मिळेल असे सांगितले.

त्यामुळे येत्या १४ एप्रिल भीमजयंतीपर्यंत इंदूमिलस्थळी प्रत्यक्ष स्मारक काम सुरू करण्यात येईल असे ठोस आश्वासन फडणवीस यांनी दिल्याचे आठवले यांनी या भेटीनंतर पत्रकारांना सांगितल्याची माहिती पत्रकारांना दिली.

भाजपला मिळाला मतविभागणीचा फायदा

शरद पवार

पुणे (प्रतिनिधी) : भाजपविरोधात समाजवादी पक्ष व काँग्रेस, बहुजन समाज पक्ष आणि अजितसिंगांचा पक्ष वेगळे लढल्याने साहजिकच त्याचा लाभ भाजपला झाल्याचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले आहेत. उत्तर प्रदेशच्या निवडणुकीकडे भाजप आणि पंतप्रधानांनी लक्ष्य केंद्रित केले होते. एका राज्यात सत्ता आणण्यासाठी पंतप्रधानांनी एवढे प्रयत्न केल्याचे पहिल्यांदाच पाहायला मिळाले. पाच राज्यांच्या निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर शरद पवारांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

शरद पवार म्हणाले, भाजपविरोधात समाजवादी पक्ष आणि काँग्रेस, बहुजन समाज पक्ष व अजितसिंगांचा पक्ष हे निवडणूक लढवत होते. त्यामुळे साहजिकच मतविभागणीचा लाभ उत्तर प्रदेशात भाजपला झाला. उत्तर प्रदेशमध्ये असा निकाल लागेल, हे अपेक्षित होते. तसेच भाजपला आता उत्तर प्रदेशात स्पष्ट बहुमत मिळाल्याने त्यांनी विकासाकडे अधिक लक्ष केंद्रित करावे, अशी तेथील लोकांची भाजपकडून अपेक्षा असेल. मुंबई व अन्य ठिकाणी उत्तर भारतीयांचे होत असलेले स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे. स्थलांतर रोखण्यासाठी तेथेच विकासात्मक कामे केली पाहिजेत.

अकाली दल-भाजप गेल्या दहा वर्षांपासून पंजाबमध्ये सत्तेत होते. यंदा त्यांना लोकांनी बाहेरचा रस्ता दाखवून काँग्रेसच्या हाती सत्ता सोपवली आहे. काँग्रेस या विजयाबद्दल अभिनंदनास पात्र आहे. पंजाब हे सीमेवरचे राज्य असल्याने देशात अन्नधान्य पुरवठ्याच्या बाबतीत ते महत्त्वाची कामगिरी करते, तसेच सीमाही लागून असल्याने त्याच्या रक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे राज्य आहे. पंजाबी लोकांच्या अपेक्षा काँग्रेसला पूर्ण कराव्या लागतील, असेही पवार म्हणाले आहेत.

गर्भलिंग निदान करणारी टोळी पकडली

दौंड तालुक्यातील प्रकार

यवत : दौंड तालुक्यातील बिरोबाचीवाडी येथे गर्भलिंग निदान करणारी टोळी यवत पोलिसांनी आज दुपारी पकडली असून यामध्ये तीन महिला व एका डॉक्टरसह अन्य चौघांना अटक केली आहे.

डॉक्टर मधुकर चंद्रकांत कोलते (४५, रा. फलटण, जि. सातारा), मदतनीस हेमंत बबन आटोळे (३५, रा. रावणगाव, ता. दौंड), चालक संतोष बबन ओतारी (४२, रा. कसबा पेठ, फलटण, जि. सातारा),सोमनाथ किसन होले (रा. बिरोबाचीवाडी, ता. दौंड), व गर्भलिंग निदान करण्यासाठी आलेल्या तीन महिलांसह पकडून अटक करण्यात आली. आज विरोबाच्या वाडीत सोमनाथ किसन होले (रा. बिरोबाचीवाडी, ता. दौंड) यांच्या घरी डॉक्टर मधुकर चंद्रकांत कोलते हे काही महिलांची गर्भलिंग निदान चाचणी करणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सुवेझ हक, सहायक पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकून त्यांना रंगेहाथ पकडले.

या छाप्यात सोनोग्राफी मशीन, एक रॅक, आठ मोबाईल, गर्भपात करण्याचे औषध, मारुती सुझुकी कंपनीची सियाझ गाडी, रोख रक्कम ५९ हजार २६० रुपये असा एकूण १३ लाख ३० हजार ८०० रुपये जप्त करण्यात आले आहे.